# प्रेसनोट

११३८३

आदेश.क्र.पोउआ/वाहतुक/ /२०१७ पुणे शहर दिनांक २६ /१२/२०१७

पुणे स्टेशन येथे सेंट्रल रेल्वे यांच्याकडुन जहाँगीर चौक ते आर टी ओ चौक या रोडलगत नवीन ओव्हर ब्रीज चे काम करण्यात येणार आहे. महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सीआर - ३७/टीआरए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशननुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मी अशोक मोराळे, पोलीस उप-आयुक्त,वाहतुक शाखा, पुणे शहर मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन पुढीलप्रमाणे सदर चे काम हे दिनांक २८/१२/२०१७ व दि.२९/१२/२०१७ रोजी रात्रौ २३.०० ते पहाटे ०५.०० वा. पर्यत करण्यात येणार आहे. सदर कालावधीत जहॉगीर हॉस्पीटल चौक ते आर टी ओ चौक या रोडवरील वाहतुक ही बंद करण्यात येणार आहे.

तरी सर्व नागरिकांनी वरील रोडवरील वाहतुक बंद असल्याने पर्यायी मार्गाचा वापर करुन वाहतुक पोलीसांना सहकार्य करावे असे आवाहन पुणे शहर वाहतुक शाखा यांचे मार्फतीने करण्यात येत आहे.